गाडी येताच उघडले जाणार कवच; मरोळ नाका स्टेशनपासून कामाला सुरुवात

# काचेच्या कोंदणात मेट्रोचे फलाट

म. टा. खास प्रतिनिधी

**मुंबई** : सध्या सर्वाधिक वेगाने बांधकाम सुरू असलेल्या 'मेट्रो ३' (कुलाबा-वांद्रे-सीप्झ) च्या फलाटाला काचेचे कवच असेल. त्यामुळे गाडी येईल त्याचवेळी हे कवच उघडले जाईल. अशाप्रकारचे कवच मरोळ नाका या स्थानकापासून बसविण्यास सुरूवात झाली आहे.

मुंबईच्या पश्चिम उपनगरांना उत्तर ते दक्षिण जोडणारा मेट्रो-३ हा वाहतूककोंडीवर मात करण्यासाठीचा महत्त्वाचा मेट्रो प्रकल्प आहे. ही मेट्रो पूर्णपणे जमिनीखालून धावणार असून त्यामध्ये २६ स्थानके आहेत. सीप्झ ते वांद्रे व वांद्रे ते कुलाबा, अशा दोन टप्प्यांत हा प्रकल्प पूर्ण केला जाणार आहे. प्रत्येक स्थानकाच्या फलाटाला असलेले काचेचे कवच, हे या प्रकल्पाचे वैशिष्ट्य असेल. त्याची उभारणी आता सुरू झाली आहे.

फलाटाला असलेल्या काचेचे कवचाला 'प्लेटफॉर्म स्क्रीन डोअर्स' असे नाव आहे. यामध्ये फलाटावर गाडी नसेल त्यावेळी त्याला कवच लागलेले असेल. यामुळे रेल्वे मार्गावर पडून होणारे अपघात होत नाहीत. गाडी येते त्यावेळी या फलाटाला असलेल्या कवचाचे दार उघडले जाते. गाडीच्या दरवाज्याजवळील कवच उघडले जाते व त्यातून प्रवासी आत जाऊ शकतात. गाडी सुटतेवेळी आधी फलाटावरील कवचाची दारे बंद होतात व त्यानंतर गाडीची दारे बंद होतात, अशा प्रकारची रचना असेल.

मेट्रो-३ च्या पहिल्या टप्प्याची कामे पूर्ण होत आहेत. त्यामुळे आता स्थानकाच्या आतील भागातील कामे सुरू आहेत. त्याअंतर्गत मरोळ नाका, या स्थानकावर कवच बसविण्याच्या कामाला सुरूवात झाली आहे.

## फक्त कुलाबा-सिप्झ मेट्रोसाठीच

मेट्रो ३ची उभारणी मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड (एमएमआरसीएल) ही विशेष उपक्रम कंपनी करत आहे. ही जमिनीखालून धावणारी राज्यातील पहिली रेल्वे असेल. काचेचे कवच हे केवळ जमिनीखालून धावणाऱ्या मेट्रोला बसविणेच शक्य होते. त्यामुळे राज्यात सध्या तरी केवळ मेट्रो-३साठीच ही सोय असेल. मरोळ नाका स्थानक असलेला या मेट्रोला पहिला टप्पा डिसेंबर २०२३ पर्यंत सुरू होण्याची शक्यता असून त्यानंतरह प्रवाशांना काचेच्या कवचाचा हा आगळा अनुभव घेता येणार आहे.



## लंडनमधून प्रारंभ

फलाटाला कवच अर्थात 'प्लेटफॉर्म स्क्रीन डोअर्स' बसविण्याचा पहिला प्रयोग लंडन मेट्रोमध्ये सर्वात आधी झाला. त्यानंतर आता जगभरातील ३८ देशांमधील मेट्रोमध्ये फलाटाला अशाप्रकारचे कवच आहे. त्यामध्ये भारतातील दिल्ली, कोलकाता, बेंगळुरू व चेन्नई येथील मेट्रोचा समावेश आहे. मात्र ही व्यवस्था केवळ भूमिगत मेट्रोला असते.